# प्रकरण चार

## वित्त विभाग

**4.578 प्रलंबित धनादेशाबाबत.**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, वसई यांचे वित्तीय वर्ष सन 2014-2015 या वर्षाच्या लेखापरीक्षणात अभिलेखे तपासणी केली असता नोंद केलेल्या धनादेशांची नमुना नं. 7 (रोखवहीमध्ये) दिनांक 31/03/2015 पर्यंत खर्ची नोंद घेवूनही लेखापरीक्षणाच्या दिवसापर्यंत वितरीत केलेले नाहीत. सदर धनादेश लेखा शाखेत पडून आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 अन्वये प्रदानाकरीता आवश्यक व तातडीची बाब असल्याखेरीज धनादेश स्वाक्षरी करु नये असे असताना केवळ वर्षाअखेर अनुदान व्यपगत होऊ नये करीता रक्कम खर्ची टाकण्यात आलेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 41 नुसार उद्दिष्ट पूर्तते पूर्वी लेख्या बाहेर रक्कम काढून ठेवणे ही बाब गंभीर असून लेखासंहितेतील तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे.

3) सदर धनादेश 6 महिन्यानंतर पुन्हा निधी जमेस धरणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

**4.579 एकस्तर निवृत्तीवेतनाचे जादा प्रदानाबाबत. (शासकीय फंड)**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती डहाणू अंतर्गत निवृत्ती झालेल्या कर्मचाऱ्याना एकस्तरप्रमाणे जादा प्रदान झालेली रक्कम वसुल करण्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक, क्रमांक सेनिवे/2013/प्र.क्र.46/सेवा-4, दिनांक 17/12/2013 नुसार आदिवासी व नक्षलग्रस्त भागातून दिनांक 01/01/2006 रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला निवृत्तीच्या दिनांकास (एकस्तर पदोन्नती पद वगळून) त्या पदाच्या पे बँड मध्ये वेतन + अनुज्ञेय ग्रेड वेतनावर निवृत्तीवेतन अदा केले आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक, क्रमांक सेनिवे/2013/प्र.क्र.46/सेवा-4, दिनांक 18/10/2014 च्या परिपत्रकातील 1 नुसार दिनांक 15/02/2014 च्या परिपत्रकास दिलेली स्थगिती उठविण्यात आलेली असल्याने दिनांक 01/01/2006 नंतर निवृत्त झालेल्या सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकस्तरप्रमाणे केलेली वेतननिश्चिती फरक सर्व भत्यासह दिनांक 01/01/2006 ते आजपर्यंत वसुल करावा.

3) श्री.मुकेशचंद भगवानदास फर्शीकर, मुख्याध्यापक पंचायत समिती, डहाणू हे दिनांक 30/06/2014 रोजी निवृत्त झाले. त्यांना एकस्तर योजनेचा लाभ दिल्याने निवृत्तीवेतन, उपदान, अंशराशीकरण जादा प्रदान झाले ती रक्कम रुपये 28,931/- वसुल करावी.

**4.580 लेखापरिक्षणास प्रमाणके उपलब्ध न झालेबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती कर्जत सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात रोखवही क्रमांक 1 ते 4 मध्ये एकूण रक्कम रूपये 5,14,122/- ची 11 प्रमाणके / देयके लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करून देणे बाबत. या कार्यालयाचे अर्धसमास पत्र क्रमांक 7,दिनांक 15/09/2016 नुसार देऊनही प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

**4.581 असंवितरीत धनादेशाबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1**)** पंचायत समिती देवगड कडील माहे फेब्रुवारी 2015 व मार्च 2015 या लेखापरीक्षण निवड महातील धनादेशपुस्तिका तपासली असता संबंधितांचे धनादेश लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अदा केलेले नाहीत. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे कलम 27 नुसार तात्काळ आदायगीच्या रक्कमेची गरज असल्याशिवाय धनादेशावर स्वाक्षरी करु नये असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच सन 2014-2015 वर्षातील इतर 10 महिन्यातील असंवितरीत धनादेशाचा आढावा घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

2) हस्तांतरीत योजना धनादेश क्रमांक 9241 ते 9300 (60), जिल्हा परिषद योजना धनादेश क्रमांक 4771 ते 4800 (30), पंचायत समिती योजना धनादेश क्रमांक 7306 ते 7343 (38) सदरची धनादेश पुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे एकूण 128 धनादेश संबंधितांना आदा झालेली खात्री होत नाही.

3) धनादेश पुस्तिका अभिलेख पर्चीला नमुद रकान्यानुसार तपशिलाची नोंद करण्यात आलेली नाही.

**4.582 दिनांक 31/03/2015 अखेर अखर्चित मुदतबाहय धनादेशाबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5)** - याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1**)** पंचायत समिती सेस, अभिकरण, जिल्हा परिषद निधी, हस्तांतरण निधी या योजनांचा माहे मार्च 2015 अखेर बँक ताळमेळ घेतला असता एक वर्षापेक्षा जादा कालावधी होऊनही धनादेशांचे रोखीकरण न झाल्याचे आढळते.

2**)** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 तसेच 31 **(**1**) (**2**)** मधील निर्देशान्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.583 पंचायत समिती सेस अंदाज पत्रकाबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2)** - पंचायत समिती वेंगुर्ला सन 2014-2015 च्या सेस अंदाज पत्रकातील तरतुदी व खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1) अंदाजपत्रकीय रक्कम व प्रत्यक्षात खर्च यांची तुलना करता खर्चाची टक्केवारी 69.13 आहे. सन 2014-2015 मध्ये पंचायत समिती उपकराची एकूण रक्कम रुपये 23,13,955/- व पंचायत समितीकडे शिल्लक असलेली रक्कम रुपये 11,01,299.12 मिळून रक्कम रुपये 34,15,254.12 पंचायत समितीने योग्य नियोजन केले असते तर खर्च करणे शक्य होते. परंतु ती रक्कम खर्च केलेली नाही.

2) कृषि विषयक तरतुद रुपये 7,50,000/- व खर्च रुपये 2,87,500/- आहे. तरतुदीशी तुलना करता खर्च 38.33 टक्के इतका कमी आहे.

3) लेखाशिर्षानुसार शिल्लक राहिलेल्या कमी-जास्त अनुशेष खर्च करणे आवश्यक आहे.

**4.584 किरकोळ रोकडवही नमुना नंबर 4 बाबत.**

**पंचायत समिती सुरगाणा**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 41) -** पंचायत समिती, सुरगाणा सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचायत समितीकडील किरकोळ रोकडवही नमुना नंबर 4 तपासणी केली असता दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 अखेर पूर्ण असल्याचे आढळून आले. लेखापरिक्षण कालावधीत किरकोळ रोकडवही व रोख शिल्लक रक्कम तपासणीसाठी मागणी केली असता दिनांक 01/04/2015 ते लेखा परिक्षण कालावधी पावेतो किरकोळ रोकडवही नमुना नंबर 4 अपूर्ण असल्याचे आढळून आले. त्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 2,दिनांक 15/10/2015 अन्वये रोख रक्कमेबाबत विचारणा केली असता शिल्लक रक्कम पंचायत समितीचे तिजोरीत ठेवलेली नाही. रक्कम स्वतःजवळ आहे, असे रोखपालाने सांगितले याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 नियम 42 (1),(2),(3),(4),(5) व नियम 50 चे कलम

(2),(3),(4) तसेच नियम 77 चे कलम (1),(2),(3),(4) प्रमाणे सहाय्यक लेखाधिकारी, गट विकास अधिकारी, रोखपाल यांनी उपरोक्त नियमाचे उल्लघंन केलेले आहे. या दरम्यान लाभार्थी हिस्सा, कर्मचारी वेतनातून शासकीय कपाती, इत्यादी असल्यास वेळेवर भरणा न झाल्याने शासकीय रकमेचा दुरुपयोग दिसून येतो. प्रशासनामार्फत कार्यवाही आवश्यक आहे.

**4.585 निवृत्तीवेतन प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चोपडा, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती चोपडा कडील निवृत्तीवेतन देयके पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखासंहिता 1968 परिशिष्ट मधील नियम 65 नुसार निवृत्ती प्रदान आदेशाची नोंदवही फॉर्म एपीपी 10 मध्ये परिरक्षीत केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 परिशिष्ट 4 मधील नियम 64 नुसार एपीपी 9 निवृत्ती वेतन नोंदवही, निवृत्ती वेतन आदेश, फेर आदेश क्रमांक, अंशराशीकरण, रक्कम इत्यादी तपशिल नमुद नाही. त्यामुळे प्रतिमहा निवृत्ती वेतन प्रदानाचे अतिप्रदान होत आहे किंवा कसे याची खात्री होत नाही.

3) निवृत्ती वेतन धारकाच्या हयाती बाबत वार्षिक पडताळणीच्या नोंदी निवृत्ती वेतन नोंदवहीत घेतलेल्या नाहीत. निवृत्ती वेतन धारकाचे हयात पुर्नविवाह, नोकरीस लागले याबाबतचे दाखले घेतलेले नाहीत. त्यामुळे कोणत्या निवृत्तीवेतन धारकाचे हयात निकषाप्रमाणे दाखले प्राप्त आहेत किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) काही निवृत्ती वेतन धारकांचे पीपीओ भरलेले नसुन अपूर्ण आहेत. तर गटविकास अधिकारी यांची एपीपी 9 वर स्वाक्षरी नाही.

5) निवृत्ती वेतन घेऊन 15 वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन देयकात अंशराशीकृत निवृत्ती वेतन दिलेले असून नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे 15 वर्ष पुर्ण झाले बाबत पडताळणी करता येत नाही. निवृत्ती वेतनाचे आदेश बँक निहाय नस्तीबध्द केलेले नाहीत.

**4.586 अखर्चीत निधीबाबत.**

**पंचायत समिती रावेर, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती रावेर, अंतर्गत घेण्यात आलेल्या योजनांच्या रोखवहयानुसार रुपये 5,96,20,009.61 इतका निधी शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद, व पंचायत समिती, लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 244 अन्वये नमुना नंबर 90 अनुदान व खर्चाची नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे वरिल प्रमाणे माहे मार्च 15 अखेर शिल्लक रक्कमेतुन न वटलेले धनादेश वजा जाता उर्वरीत अखर्चित निधीबाबत लेखाशिर्षनिहाय व वर्षनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. एकूण शिल्लक निधी रक्कम रुपये 5,96,20,009/- दिसुन येते.

2) अखर्चित रक्कमांचा वर्ष निहाय गोषवारा काढण्यात न आल्याने अखर्चित निधी कोणत्या वर्षापासून आहे. याबाबत पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्रक्र 128/अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 नुसार शासनाने जिल्हा परिषदांना अखर्चित निधी पुढील आर्थिक वर्ष अखेर पर्यंत करण्याची अनुमती दिलेली आहे. परंतु पुढील आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे.

**4.587 लेखाविभागाकडील लेख्यामधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भुसावळ, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती, भुसावळ यांचे कार्यालयातील लेख्यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 26 (1) अन्वये नमुना नंबर 1 मध्ये, धनादेश पुस्तकांचा हिशोब ठेवलेला नाही.

2) रोखवहीतील रकाना क्रमांक 1 ते 17 मध्ये परीपुर्ण नोंदी घेणेत आलेल्या नाहीत.

3) नमुना नंबर 13 व 14 मध्ये सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

4) अभिकरण योजना / 13 वा वित्त आयोगाकडील शिल्ल्क रक्कमांबाबत, दिनांक 31/03/2015 अखेर बॅकेचे शिल्लकेचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

**4.588 गटशिक्षण अधिकारी यांचेकडील रोकडवही उपलब्ध न झालेबाबत.**

**पंचायत समिती धरणगांव, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** गटशिक्षण अधिकारी यांचेकडील सन 2014-2015 वर्षाची रोकडवही लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, अधिनस्त शिक्षण विभागाकडील, तालूका गटशिक्षण अधिकारी यांचेकडील रोकडवही व त्या अनुषंगिक लेखे अर्धसमास पत्र क्रमांक 2,दिनांक 19/10/2015 अन्वये लेखी स्वरुपात मागणी करुनही रोकडवही लेखा परीक्षणास सादर केलेली नाही किंवा अर्धसमास पत्राचे उत्तरही देण्यांत आलेले नाही. ही बाब नियमबाह्य बाबींना वाव देणारी आहे.

2) शिक्षण विभागास शालेय पोषण आहार अंतर्गत, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, स्वच्छतागृह, बांधकाम इत्यादीसाठी रकमा वितरीत केलेल्या असून लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने अहवाल वर्षात किती रकमा प्राप्त झाल्या व किती रकमा वितरीत झाल्या, रकमांचा विनियोग झाला किंवा नाही याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

**4.589 रोकडवहीच्या शिल्लक कमी जादा केल्याबाबत.**

**पंचायत समिती अहमदनगर, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती अहमदनगर, यांच्या कार्यालयातील रोखपाल यांची दैनंदिन रोखवहीची तपासणी केली असता रोखवहीला दिनांक 03/11/2014 रोजी रूपये 633/- ने शिल्लक कमी घेतली आहे. दिनांक 05/11/2014 रोजी रूपये 501/- ने जादा घेतली आहे. त्यामुळे रूपये 132/- रोखवहीची शिल्लक कमी केली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 13 अन्वये वसूल रक्कम वेळच्यावेळी सर्व अचुक भरणा करणे आवश्यक असताना तसे न करता वरील प्रमाणे कमी जादा भरणा केलेल्या आहेत. कमी जादा भरणा केलेल्या रकमा मुळ रूपये 132/- चा अपहार झालेला आहे.

**4.590 प्रलंबित अग्रीमाबाबत.**

**पंचायत समिती शेवगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** अग्रीम नोंदवहीचे लेखा परीक्षण केले असता रक्कम रुपये 1,00,000/- अग्रिम दिले आहे. सदर अग्रिमची समायोजन सन 2014-15 पर्यंत झाले नाही. यापैकी श्री. एल आर पुरमले, उपअध्यापक यांचे रुपये 1,00,000/- व श्री. एस पी चव्हाण, कार्यालय अधीक्षक यांचे रक्कम रूपये 45,300/- यांच्याकडून येणे बाकी आहे. व श्री. एस पी चव्हाण, कार्यालय अधीक्षक रुपये 45,300/- यांची अग्रिम वसुली करण्यांत आली आहे. परंतु त्यांच्याकडून व्याज व दंडाची रक्कम वसुल करण्यांत आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व. पंचायत समिती लेखा संहिता 1968 नुसार नियम क्रमांक 210 नुसार अग्रिमबाबत तरतूद आहे. नियम क्रमांक 212 नुसार नमुना नंबर 79 नोंदवही ठेवली आहे. अग्रिमची वसुली वेळीच होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक झेडपीए/प्र.क्र.522/ वित्त-9,दिनांक 10/12/2010 अन्वये अग्रिम वसुलीबाबत सूचना देण्यांत आल्या आहे. त्यातील सूचना क्रमांक. 6 नुसार अग्रीमाच्या वसुलीबाबत संबंधीताच्या मालमत्तेतून वसुलीबाबत कार्यवाही करावी अशा सूचना देण्यांत आल्या आहे.

**4.591 वाहनांच्या अतंर्गत सजावटींकरीता केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पारनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती पारनेरच्या पंचायत समिती सेस निधीतून वाहन क्रमांक एमएच 16/एन 460 प्रमाणक क्रमांक 3,दिनांक 25/11/2014 रुपये 9,000/- व वाहन क्रमांक एमएच 16/एन 583, प्रमाणक क्रमांक 1,दिनांक 04/12/2014 रुपये 15,570/- वाहनाच्या अंतर्गत सजावटीवर खर्च करण्यांत आला आहे. महाराष्ट जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 101 नुसार पंचायत समिती गठ अनुदानातुन खर्च करावयाच्या बाबीचा समावेश दुसऱ्या अनुसुचीनुसार खर्च करणे अभिप्रेत होते. वाहनाची अंतर्गत सजावट या बाबीचा समावेश दुसऱ्या अनुसुचीमध्ये होत नसल्याने त्यावर झालेला खर्च रुपये 24,570/- मान्य करता येत नाही.

**4.592 महसुली लेखाशिर्षाखालील अनुदान नियमबाहयपणे ठेव सदरी घेतल्याबाबत.**

**पंचायत समिती सातारा, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती सातारा यांनी सन 2011-12 ते 2014-15 अखेर प्राप्त झालेले अनुदान रक्कम रुपये 8,33,65,624/- खर्च न करता इतर संकिर्ण ठेव खाती जमा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 214 व 215 नुसार नमुना नंबर 71 मध्ये वेगवेगळया बाबींसाठी स्वतंत्र पृष्ठे ठेवण्यात आलेली नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 216 अनुसार पंचायत समितीने संकिर्ण ठेव सुरक्षा ठेव खाती ठेवण्यात आलेल्या रकमांबाबत नोंदी घेऊन मासिक लेख्यातील आकडयाबरोबर पडताळून पाहिलेल्या नाहीत. तसेच नमुना नंबर 13 व 14 चे मासिक गोषवारा लेख्यांशी जुळतात हे पडताळून पाहणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 219 नुसार तीन वर्षावरील ठेवी व्यपगत करणे आवश्यक असता तीन वर्षावरील सन 2011-12 अखेरच्या रक्कम रुपये 22,65,653/- च्या सुरक्षा ठेवींच्या रकमा व्यपगत करण्यात आलेल्या नाहीत.

4) संकिर्ण ठेव नोंदवहीमध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 216 नुसार मासिक व वार्षिक गोषवारा काढलेला नाही. सुरक्षा ठेवींच्या गोषवाऱ्यामध्ये उपरीलेखन केले असल्याने काढलेल्या गोषवाऱ्याचा नमुना नंबर 13 व 14 चे मासिक गोषवारा लेख्यांशी पडताळून पाहता आलेला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 218 नुसार कार्यवाही न करता वेतनाच्या, अनुदानाच्या, ग्रामपंचायत अपहारीत रकमा, लाभार्थी हिश्याच्या रकमा संकिर्ण ठेव खाली जमा केल्या आहेत. महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1091/1570/प्र.क्र.1285/23,दिनांक आर्थिक वर्ष संपल्यावर येणाऱ्या ऑगस्ट अखेरपर्यंत शासनास तसेच लाभार्थी हिश्याची रक्कम ज्या त्या वेळी पुरवठादारास आदा करणे आवश्यक होते. आक्षेपात नमूद केलेल्या रकमा सन 2011-12 पासून संकिर्ण ठेव सदरी जमा केल्या आहेत.

**4.593 रोखीने/बेअरर धनादेशाद्वारे नियमबाहय रकमा आदा केलेबाबत.**

**पंचायत समिती पाटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समितीकडील बँक ताळमेळ पत्रकांची तपासणी करता अभिकरण निधीतील एकूण रुपये 6,27,143/- इतक्या रकमेचे धनादेश रोखीने म्हणजेच बेअरर वटल्याचे बँक स्क्रोल वरुन दिसून येते. बेअरर धनादेश देण्याबाबत कोणताही समर्पक खुलासा करण्यात आलेला नाही. तसेच सर्व रकमा या व्यक्तीगत आदाईगीच्या असतांना रेखांकित धनादेशाद्वारे आदा न केलेने संपुर्ण रक्कम संबंधीतांस मिळालेबाबतची खात्री देता येत नाही. तसेच रक्कम आदाईगीमध्ये गैरव्यवहार अथवा नियमबाहय कपाती करण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्तबाबत सर्व संबंधीतांच्या मुद्रांकित पोहोच घेणे आवश्यक आहे. अथवा रक्कम वसुलात आणावी लागेल.

**4.594 शासन अनुदान रक्कमा पंचायत समिती व ठेव खात्यावर शिल्लक / अखर्चित ठेवण्याबाबत.**

**पंचायत समिती आटपाटी, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती आटपाडीचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करताना लेखापरीक्षण कालावधीची ठेव नोंदवही तपासणी केली असता खालील नमूद केलेनुसार वेगवेगळ्या विकास कामासाठी प्राप्त झालेल्या शासन अनुदान रक्कमा नियमबाह्यपणे पंचायत समितीकडे लेखापरीक्षण कालावधी अखेर शिल्लक रक्कम रुपये 7,99,571/- ठेवणेत आलेल्या आहेत, सदर बाब नियमबाह्य आहे.

**4.595 अनामत रकमा बाबत.**

**पंचायत समिती वाळवा, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** अनामत रकमा बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 218(1) अन्वये कोणत्याही महसूली शिर्षाखाली ज्याची नोंद करणे स्पष्टपणे शक्य असेल अशा रक्कमा ठेवीच्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात येणार नाहीत असे असताना रक्कमा ठेव म्हणून घेतलेल्या आहेत तसेच त्यातील काही शासकीय रकमा नियमबाह्य पणे व्यपगत करून जिल्हा परिषदेच्या 11 संकीर्ण ठेवी मध्ये जमा करण्यात आलेल्या आहेत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 52(2) नुसार रकमा खर्च झाल्या असे दर्शवून अनामत खाती ठेवता येत नसताना ठेवलेले आहेत व रकमा अनामत शिर्षाखाली ठेवून नंतर नियमबाह्यरित्या खर्च केलेले आहे.

**4.596 शासन अनुदान रक्कमा.**

**पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती पलूस यांचेकडील सन 2014-2015 च्या लेखा परिक्षण कालावधीत ठेव नोंदवहीची तपासणी केली असता शासन अनुदान रकमा पंचायत समितीकडे लेखापरिक्षण कालावधी अखेर शिल्लक ठेवणेत आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 218 नुसार अनुदान ठेव खाती ठेवता येत नसताना ठेवणेत आले असून वरील नमूद केले नुसार प्राप्त झालेली एकूण अनुदान रक्कम रुपये 1,62,10,554/- सबंधित बाबीवर ज्या त्या आर्थिक वर्षात खर्च न करता संकीर्ण ठेव खाती शिल्लक/अखर्चित असल्याचे आढळून आलेले आहे. सदरची बाब ही नियमबाह्य आहे. दिनांक 31/03/2015 च्या लेखापरीक्षण कालावधी अखेर अखर्चित ठेवणेत आलेली रक्कम रुपये 1,62,10,554/- त्वरित शासन निधीत भरणा करावी.

**4.597 शासन निधीवर उपर्जित व्याज रकमा उपकर निधीमध्ये नियमबाह्य जमा केल्याबाबत.**

**पंचायत समिती हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती हातकणंगले यांनी त्यांच्या अधिनस्त शासन निधीवर व जिल्हा परिषद स्वनिधीवर उपार्जित व्याज रक्कम रुपये 19,74,124/- पंचायत समिती उपकर निधीमध्ये नियमबाह्य जमा करुन खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासनाकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झालेल्या अथवा अभिकरण तत्वावर चालविण्यास दिलेल्या योजनाकरीता शासनाकडून जिल्हा परिषदेस निधी उपलब्ध होतो. अशा शासन निधीवर व जिल्हा परिषद स्वनिधीवर उपार्जित होणारे व्याज हे त्या त्या निधीखाती जमा करणे आवश्यक असताना सन 2014-15 मध्ये सदर निधीवर मिळालेली व्याजाची रक्कम रुपये 19,74,124/- नियमबाह्यपणे पंचायत समिती उपकर निधीमध्ये जमा करुन खर्च केली आहे.

**4.598 शासन निधीवर उपार्जित व्याज रकमा उपकर निधीमध्ये नियमबाह्य जमा केल्याबाबत.**

**पंचायत समिती राधानगरी, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती राधानगरी यांनी त्यांच्या अधिनस्त शासन निधीवर व जिल्हा परिषद स्वनिधीवर उपार्जित व्याज रक्कम रुपये 9,80,243/- पंचायत समिती उपकर निधीमध्ये नियमबाह्य जमा करुन खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासनाकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झालेल्या अथवा अभिकरण तत्वावर चालविण्यास दिलेल्या योजनाकरीता शासनाकडून जिल्हा परिषदेस निधी उपलब्ध होतो. अशा शासन निधीवर व जिल्हा परिषद स्वनिधीवर उपार्जित होणारे व्याज हे त्या त्या निधीखाती जमा करणे आवश्यक असताना सन 2014-15 मध्ये सदर निधीवर मिळालेली व्याजाची रक्कम रुपये 9,80,243/- नियमबाह्यपणे पंचायत समिती उपकर निधीमध्ये जमा करुन खर्च केली आहे.

**4.599 प्रलंबित अग्रिम रकमेबाबत.**

**पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 43) -** पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचेकडे सन 2014-2015 अखेरची एकुण थकीत अग्रिम रक्कम रुपये 12,46,097/- एवढ्या रकमेचे समायोजन करणेत आलेले नाही.

1) सन 2006-2007 मध्ये प्रदान करण्यात आलेले पूरपिडित अग्रिम रक्कम रुपये 5,43,686/- इतके वसुल होणे बाकी असल्याचे दिसून येते. सदरबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2009 प्र.क्र.522/वित्त2009 मुंबई-32,दिनांक 10/12/2010 नुसार योग्य ती कार्यवाही करुन ज्या आर्थिक वर्षातील अग्रिम असेल त्याच आर्थिक वर्षात ती वसूल करणे आवश्यक आहे. अथवा संबंधीतांचे वेतनातून समायोजन करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) सन 2014-2015 मध्ये रुपये 4,50,000/- इतके वैदयकिय अग्रिम प्रदान करण्यात आले आहे. तसेच रुपये 90,000/- मागील वैदयकिय अग्रिम वसुल होणे बाकी आहे. वैदयकिय अग्रिम प्रदान केलयापासून 6 महिन्याच्या आत वसुल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. वसुली झाल्यांस 12 टक्के व्याजदराने अग्रिमाचे वसुल करावयाचे आहे. तरी आता वैदकिय अग्रिमाची रक्कम रुपये 5,40,000/- व्याजासह वसुल करणे आवश्यक आहे.

3) सन 2014-2015 अखेर एकूण रक्कम रुपये 12,46,097/- इतके अग्रिम वसुल होणे बाकी आहे. अग्रिमाचे वसुलीबाबत विशेष मोहिम राबवून संपूर्ण अग्रिम रुपये 12,46,097/- त्वरीत वसुल करणे आवश्यक आहे.

**4.600 अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करणेबाबत.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती मंगळवेढा यांचेकडील सन 2014-2015 चे लेखा परीक्षण कालावधीत खालील नमुद केलेनुसार वेगवेगळ्या लेखाशिर्षा अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानापैकी अखर्चित राहीलेली रक्कम ज्या ज्या लेखा शिर्षाखाली शासनास भरणा न करता मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे वर्ग केली असल्याचे आढळून आलेले आहे.

सदरबाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1002/ प्र.क्र.128/अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 मध्ये नमूद केलेनूसार अखर्चित रकमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासननिधीत भरणा करणे आवश्यक असताना पंचायत समिती मंगळवेढा यांनी अभिकरण निधी व जिल्हा निधी एकूण अखर्चित रक्कम रुपये 2,22,88,973/- नियबाहयपणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सोलापूर यांचेकडे वर्ग केलेली आहे. याबाबत योग्य तो खुलासा करुन सदरच्या अखर्चित रकमा योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासननिधीत भरणा केलेबाबतची पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**4.601 अखर्चित रक्कम शासन खाती भरणा न करता जिल्हा परिषदेकडे भरणा केल्याबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** पंचायत समिती पंढरपूर यांचेकडील सन 2014-2015 चे लेखा परीक्षण कालावधीत वेगवेगळ्या लेखाशिर्षा अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानापैकी अखर्चित राहीलेली रक्कम रुपये 2,04,80,568/- ज्या त्या लेखा शिर्षाखाली शासनास भरणा न करता मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे वर्ग करणेत आलेली आहे.

उपरोक्त नमुद केलेनुसार सन 2013-2014 मधील प्राप्त झालेल्या शासन अनुदानातील अखर्चित राहिलेल्या रक्कमा या योग्य त्या लेखा शिर्षाखाली शासनास भरणा न करता पंचायत समिती स्तरावर शिल्लक ठेवून विलंबाने मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे वर्ग केलेली आहे. सदरची बाब ही गंभीर व नियमबाह्य स्वरुपाची असलेने सदरचे अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा करुन सदरची रक्कम रुपये 2,04,80,568/- आज अखेरचे व्याजासह शासन निधीत भरणा केलेबाबतची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**4.602 अभिकरण निधी बँक ताळमेळबाबत.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 44) -** पंचायत समिती सांगोला यांचेकडील सन 2014-2015 चे लेखा परीक्षण कालावधीत अभिकाण निधी बँक ताळमेळ पडताळणी केली असता रोजकीर्दमधील व बँक पासबुकामधील शिल्लक यामध्ये दिनांक 31/03/2015 रोजी रक्कम रुपये 85,54,919/- एवढी तफावत असल्याचे आढळून आलेले आहे.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 57 प्रमाणे दिलेल्या विहित नमुन्यामध्ये बँक ताळमेळ घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही तसेच रोजकिर्दमध्ये जमा व खर्च यांचा वार्षिक गोषवारा काढलेला नाही.

2) दिनांक 31/03/2015 रोजीच्या बँक ताळमेळ तपशीलात नमुद केलेनुसार न वटलेल्या धनादेशाची एकुण रक्कम रुपये 1,03,27,046 एवढी असुन सबब एक वर्षावरील धनादेश लेखा संहिता नियम 31(1) नुसार कार्यवाही करुन बँक ताळमेळ मधील तफावत कमी करुन पुर्तता दाखवणे आवश्यक आहे.

3) बँक ताळमेळ तपशिलात नमुद केलेनुसार रोजकिर्दीस जमा परंतु बँक खातेवर जमा नसलेली रक्कम रुपये 30,971/- एवढी रक्कम जिल्हा परिषद सेस निधी मधील बँक खातेवर जमा घेतलेची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

4) बँक ताळमेळ तपशिलात नमूद केलेनुसार बँकेने धनादेश रुपये 33,803/- ऐवजी रुपये 83,803/- म्हणजेच रक्कम रुपये 50,000/- रुपयांनी जादा वटविला आहे. सदर रक्कम रुपये 50,000/- रुपयांनी जादा अदा झाल्याबाबत वसुलीची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) बँक ताळमेळ तपशिलात नमूद केलेनुसार बँक खातेवरील रक्कम रुपये 5,94,218/- एवढी रक्कम बँकेने नजरचुकीने खर्च दाखविली आहे. तथापी सदर रक्कम कोणत्या लेखाशिर्षाखाली जादा खर्च झाली याबाबत योग्य तो खुलासा होत नाही. तफावतीची रक्कम सदर निधीच्या खाती जमा करणे आवश्यक आहे.

**4.603 लेखापरीक्षणांस प्रमाणके उपलब्ध न केलेबाबत.**

**पंचायत समिती करमाळा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती करमाळा यांचेकडील सन 2014-2015 या लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्र 14 व 19 अनुक्रमे दिनांक 16/09/2015 व दिनांक 22/09/2015 अन्वये जिल्हा निधी, अभिकरण निधी, जिल्हा परिषद सेस मधून खर्च केलेल्या एकूण रुपये 21,90,394/- ची प्रमाणके लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेली नाहीत.

**4.604 रोजकीर्दी वरील खाडाखोडीबाबत.**

**पंचायत समिती करमाळा, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-2015 चे जिल्हा निधीच्या रोजकीर्दीचे अवलोकन केले असता, दिनांक 25/04/2014 ते दिनांक 31/03/2015 पर्यत एकूण जमा

एकूण खर्च व शिल्लक रक्कम यामध्ये खाडाखोड केलेली आहे. कॅशबुक लिहताना पांढ-या शाईचा वापर केलेला आहे. दिनांक 11/08/2014 पासून प्रत्येक दिवस अखेरची जमा, खर्च व शिल्लक रक्कम नमूद करताना दिवस अखेर पांढरा कागद चिकटवून रक्कमा लिहल्या आहेत. त्यामुळे अखेरीची शिल्लक रक्कम समजून येत नाही व केलेले व्यवहार योग्य आहेत किंवा कसे? याबाबत साशंकता आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 12 नुसार प्रत्येक खाडाखोड ही सक्षम प्राधिका-यांने सांक्षाकिंत करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही झालेंली नाही. तसेच पंचायत समितीने रक्कमा अदा करताना फक्त ठेकेदाराना देय (NET) रक्कमाचे धनादेश आहरित केलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 25 ते 33 नुसार सक्षम प्राधिका-यानं रक्कम देण्याबाबत आदेश दिल्यानंतर एकाच वेळी सर्व देय रक्कमाचे तात्काळ धनादेश काढणे अनिवार्य आहे. तथापि पंचायत समिती कडून देयकातील सर्व रक्कमाचे धनादेश अदा न करताच रक्कम अदा झाल्याची नोंद नमुना नंबर 14 ला घेण्यात येते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 58 व 60 नुसार लेखा शाखेतून रक्कम अदा केल्यानंतर नमुना नंबर 14 ला नोंद घेणे आवश्यक आहे. तथापि फक्त देय (NET) रक्कमाचे धनादेश काढून इतर शासकीय वजाती (उदा. रॉयल्टी, व्हॅट, व्यवसाय कर,विमा, ठेवी इत्यादी) चे धनादेश न काढताच रक्कमा अदा न करताच नमुना नंबर 14 ला नोंदी घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे पंचायत समितीकडून ठेवण्यात आलेले हे लेखासंहितेनुसार विहीत पध्दतीने ठेवलेले नाहीत. याबाबत पंचायत समितीच्या लेखा शाखेची अंतर्गत लेखापरीक्षण पथकाकडून सविस्तर तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच रोजकिर्दीवरील खाडाखोड, कागद चिटकवणे यात कोणताही गैरव्यवहार, गैरमेळ नाही यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

**4.605 शासकीय वसुल रकमा भरणा न केलेबाबत.**

**पंचायत समिती कुर्डवाडी, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 31 (1) अन्वये न वटलेल्या धनादेशाची रक्कम जमा केल्यानंतर उपरोक्त सरकारी करांची रक्कम भरणा करण्यासाठी नवीन धनादेश काढून रक्कम भरणा करणे आवश्यक असतां सन 2014-2015 चे लेखापरीक्षणामध्ये व्यवसायकर, गटविमा, उपकर, प्राप्तीकर, रॉयल्टी, विक्रीकर, विमा इत्यादी वसुल रक्कम रुपये 3,38,547/- वसुल केल्याच्या दिनांकापासून 7 दिवसाच्या आंत योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा केलेल्या नाहीत.

**4.606 अग्रीम नोंदवहीबाबत (जिल्हा निधी व जिल्हा परिषद सेस).**

**पंचायत समिती कुर्डूवाडी, जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 210 (ब) व 213 अन्वये अग्रीम दि ल्यानंतर 10 समान हप्त्यांत वसुल होणे आवश्यक आहे. पंचायत समिती कुर्डूवाडीचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे नमुना नंबर 79 ॲडव्हान्स नोंदवही तपासली असतां सन 1962-1963 पासून आजतागायत इतर अग्रीम रक्कम रुपये 2,95,541/- वसुल होणे बाकी आहे. धान्य अग्रीम सन 2011-2012 ते 2014-2015 अखेर रक्कम रुपये 88,500/- इतके वसुल होणे बाकी आहे. एकूण रक्कम रुपये 3,84,041/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.607 अंशराशीकरण देयकासोबत मुळ आदेश नसतांनाही नियमबाहय प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती संग्रामपुर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, संग्रामपुर येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतेवेळी निवृत्तीवेतन विभागातील प्रमाणक क्रमांक 383, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 2,77,047/- श्रीमती उषा वामनराव केव्हाळकर, सेवानिवृत्ती यांना अंशराशीकरणाची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे आदेश क्रमांक 3143, दिनांक 31/03/2013 अन्वये अंशराशीकरण मुल्य रक्कम रुपये 2,77,047/- रकमेस मंजुरी देण्यात आलेली आहे. देयकासोबत अंशराशीकरण

मंजूरीबाबत मुळ आदेश जोडणे आवश्यक असतांना, झेरॉक्स प्रत जोडण्यात आली आहे. मंजुरी आदेश हा दिनांक 31/03/2013 रोजीचा असल्याने सदर अंशराशीकरणाचे प्रदान हे सन 2013-2014 मध्ये झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीतास दुबार प्रदान होण्याची शक्यता आहे. मंजूरी आदेश दिनांक 31/03/2013 चा असतांना सुध्दा इतक्या विलंबाने म्हणजेच दोन वर्षांनी संबंधीतांना देयक अदा करण्यात आले आहे.

**4.608 आयकराचे त्रैमासिक विवरणपत्र नमुना 24Q विहीत मुदतीत न भरल्याने जिल्हा निधीच्या रक्कम रुपये 13,58,159/- ची आयकर विभागाने परस्पर केलेल्या कपातीबाबत.**

**पंचायत समिती शेगांव, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 मधील नियम 200(3**)** नुसार आयकराचे त्रैमासिक विवरणपत्र् नमुना 24Q मध्ये दर तीन महीन्यानी आयकर विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे तथापि सन 2007-2008 पासुन पंचायत समितीने विवरणपत्र नमुना 24Q सादर न केल्याने रक्कम रुपये 13,58,159**/-** एवढी रक्कम आयकर विभागाने जिल्हा निधीतुन परस्पर कपात केल्याने जिल्हा निधीचे नुकसान झाले आहे**.**

2) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 200(3) नुसार अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन आयकर कपात केल्यानंतर त्याचे तिमाही विवरण नमुना 24Q मध्ये तपासुन व खात्री करुन (TDS) आयकर विभागाकडे भरणा करण्याची जबाबदारी आयकर कपात करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकारी यांची आहे**.**

**4.609 31 मार्च, 2015 अखेरच्या अखर्चित निधीबाबत.**

**पंचायत समिती मलकापुर, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** दिनांक 31/03/2015 अखेर रक्कम रुपये 5,02,81,818/- निधी अखर्चित असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती मलकापुर यांचे रोखवहीनुसार 31 मार्च, 2015 अखेर विविध निधीची रक्कम अखर्चित आहे**.** महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे परीशिष्ट नियम 2 नुसार प्राप्त अनुदान हे मागील दायीत्व व चालु खर्च भागविण्यासाठी असुन त्यामधुन 31 मार्च**,** 2015 पर्यंत खर्च करण्यात यावा व त्यानंतर अखर्चित निधी परत न केल्यामुळे शासननिधी विनाकारण गुंतुन पडला असुन त्याचा विनियोग झालेला नाही**.** अनुदान निर्धारणाची वाट न पाहता अखर्चित रक्कम रुपये 5,02,81,818/- शासन खाती वेळीच भरणा करणे क्रमप्राप्त ठरते**.**

**4.610 बाजार हर्रासीच्या रकमा जमा न करणे.**

**पंचायत समिती देऊळगाव राजा, जिल्हा बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1**) **-** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, देऊळगाव राजाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षात बाजार हर्रासीच्या नस्तीची तपासणी केली असता सन 2009-2010 चे रुपये 1,11,000/- श्री.श्रावण कीसन डोईफोडे, राहणार दगडवाडी, सन 2010-2011 मध्ये रुपये 1,38,700/- श्री.बबन विठोबा मांटे, राहणार डिग्रस व सन 2013-2014 चे 2,82,000/- श्री.रमेश शंकर शिंगणे, राहणार देऊळगाव मही यांनी ग्रामपंचायत बाजार हर्रासीच्या रकमा जमा करण्यात आलेल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 3 दिनांक 07/10/2015, अर्धसमास पत्र क्रमांक 4 दिनांक 08/10/2015 अर्धसमास पत्र क्रमांक 5 दिनांक 09/10/2015 अन्वये रकमा वसुली बाबत पंचायत समितीने व जिल्हा परिषदने कोणती कार्यवाही केली याबाबत विचारणा केली असता पंचायत समितीकडुन उत्तर प्राप्त झाले नाही.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचे अट क्रमांक 8 नुसार ज्या ठेकेदाराचे नावे बाजार हर्रास कायम होईल त्याला हर्रास रकमेपैकी 25 टक्के रक्कम तत्काळ लिलावाच्यावेळी लिलाव अधिकारी यांचेकडे जमा करावी व उर्वरीत 75 टक्के रक्कम 15 दिवसाचे आत भरणा करावी विहीत मुदतीत रक्कम न

भरल्यास लिलाव रदद करण्यात येईल व 25 टक्के जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व परत बाजार हर्रास करण्यात येईल. परंतु संबंधीतांकडुन बाजार हर्रासीची एकुण रक्कम रुपये 5,31,000/- जिल्हा परिषदेकडे जमा न केल्याने संबंधीत ठेकेदाराचे आर्थीक हित जोपासण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

**4.611 आयकर निर्धारणातील वेतनपत्रकात वार्षिक उत्पन्न कमी दर्शवुन कर निर्धारण रकमेतील अनियमितता.**

**पंचायत समिती मोताळा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 241, दिनांक 31/03/2015 नुसार कालबध्द पदोन्नतीचे वेतन रक्कम रुपये 2,92,558/- इतके वार्षिक वेतन पत्रकात समाविष्ट केले नाही.

2) घरबांधणी कर्जावरील रक्कम रुपये 18,630/- ची सुट घेतली, परंतु सदरचे विवरण हे सन 2013-2014 या आर्थिक वर्षातील असतांना 2014-2015 मध्ये सुट घेतली आहे. सदरची सुट दर्शविता येणार नाही.

3) 80-सी खाली घेतलेल्या कपातीत रक्कम रुपये 11,246/- घरबांधणी मुददलापोटी कपात दर्शविली. परंतु सदरचे बँक विवरण हे सन 2013-2014 वर्षातील असल्यामुळे सदरची कपात दर्शविता येणार नाही.

4) एकुण भरणा करावयाचा आयकर रक्कम रुपये 53,224/- असतांना प्रत्यक्ष भरणा हा रुपये 2,790/- इतकाच केला आहे.

**4.612 कंत्राटी ग्रामसेवक यांची कायम प्रवासभत्ता देयकाचे थकबाकी प्रदानातील अनियमितताबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती नागपूर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** कंत्राटी ग्रामसेवकांना अनुज्ञेय नसतांना 1 डिसेंबर 2013 पुर्वीचे कायम प्रवासभत्ता देयक थकबाकीचे प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीआर 2010/प्र.क्र.178/आस्था-5, दिनांक 09/12/2011 अन्वये ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना दरमहा रूपये 1,100/- इतका कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय करण्यात आला. परंतु कंत्राटी ग्रामसेवकाचा उल्लेख नसल्याने सदर शासन निर्णयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्रमांक डिसीआर 2010/प्र.क्र 178/आस्था-5, दिनांक 20/04/2014 अन्वये कंत्राटी ग्रामसेवकांना दिनांक 01/12/2013 पासून कायम प्रवासभत्ता लागु करण्यात आला. तसेच 01/12/2013 पुर्वीची प्रवासभत्याची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय नाही, असे स्पष्ट नमुद असतांना कंत्राटी ग्रामसेवकांना प्रदान करण्यात आलेली कायम प्रवासभत्ता देयक थकबाकी प्रदानाची रक्कम रूपये 1,00,100/- वसुलपात्र आहे.

**4.613 नागपूर मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकुन पडलेल्या रकमेबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती सावनेर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, सावनेर चे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले की, नागपूर मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवहार बंद करण्यात आल्याने पंचायत समितीचा निधी मोठया प्रमाणावर बँकेत अडकुन पडला आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2002 /प्र.क्र.4127/वित्त-3(24),दिनांक 17/08/2002 अन्वये जिल्हा परिषदेला त्यांचेकडील रक्कम मध्यवर्ती बँक किंवा कोषागाराचा व्यवहार ज्या बँके मार्फत चालतो त्या बँकेत गुंतवायचे असतांना बँक व्यवहार बंद असल्याने निधी बँकेत अडकुन पडल्याने पंचायत समितीचे नुकसान झाले आहे.

**4.614 रजाप्रवास सवलतीतील अनियमितता. (शासन निधी).**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1101/प्र.क्र.48/सेवा-5, दिनांक 06/10/2002 अन्वये रेल्वेच्या प्रवासाचे A/C II Tyre तिकीट क्रमांक व दिनांक नमुद केले नाही.

2) मंजूर आदेशानुसार प्रवासाच्या मार्गात बदल केला असुन आदेशात खाडाखोड केली आहे.

3) प्रवासभत्ता देयकासोबत पत्नी शासकीय नोकरीत आहे किंवा नाही प्रमाणपत्र जोडले नाही.

उपरोक्त बाबीवरून प्रत्यक्ष कोणताही प्रवास न करता आर्थिक लाभाच्या दृष्टीने देयक सादर केल्याचे स्पष्ट होते.

**4.615 शासकीय निवासस्थानाचे निवास भाडे व सेवा शुल्क वसुल न करणेबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाव -2000 प्र.क्र.97/2000 सेवा 5,दिनांक 17/02/2001 अन्वये कर्मचाऱ्यांना दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ती शुल्क व सेवा शुल्क वसुल केलेले नाही.

2) अर्धसमासपत्र क्रमांक 8,दिनांक 06/11/2015 अन्वये पंचायत समिती अंतर्गत किती निवासस्थाने आहे व किती निवासस्थाने वाटप करण्यात आले आहे याबाबत नोंदवही सादर करण्याबाबत कळविले असतांना कोणतेही दस्ताऐवज सादर करण्यात आले नाही. त्यामुळे किती कर्मचाऱ्याना निवासस्थानाचे वाटप केले व त्यांच्या वेतनातून अनुज्ञाप्ती शुल्क वसुल करण्यात येत आहे किंवा कसे? याची पडताळणी करता आली नाही.

**4.616 संगणक खरेदी प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मोहाडी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** वित्त विभाग, पंचायत समिती, मोहाडी, यांनी हस्तांतरीत योजना योजनेत्तर अनुदानातुन प्रमाणक क्रमांक 855, दिनांक 17/11/2014 रक्कम रुपये 76,650/- चे 2 नग संगणक खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

संगणक खरेदीकरीता उपलब्ध दरकरारामध्ये संगणकाची किंमत प्रत्येकी रुपये 36,488/- (संगणक पुरवठा व इतर करांसहीत) आहे. परंतु वित्त विभागाने ACI Computers यांचे कडुन देयक क्रमांक 031, दिनांक 13/11/2014 अन्वये Intel Desktop Windows चे 2 संगणक प्रत्येकी रुपये 38,325/- प्रमाणे खरेदी केलेली आहे. त्यामुळे रुपये 3,674/- अधिक प्रदान केलेले आहे.

**4.617 जमा पावती नमुना 10 व्दारे वसुल केलेली रक्कम रोखपुस्तकात जमा न करणेबाबत**

**पंचायत समिती अहेरी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** जमा पावती नमुना 10 व्दारे वसुल केलेली रक्कम रूपये 65,447/- रोखपुस्तकात जमा केली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नमुना 10 नुसार वसुल रक्कम रूपये 65,447/- रोखपुस्तकात दिनांक 31/03/2015 पर्यंत घेण्यात आले नाहीत. वसुल झालेल्या रक्कमा तात्काळ रोखपुस्तकात जमा करून चालान व्दारे बँकेत जमा करणे आवश्यक असते. परंतु रक्कमा जमा न केल्यमुळे सदर रकमेची तात्पुरती अफरातफर बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून वसुलीबाबत कार्यवाही करावी व रक्कम बँकेच्या खात्यात जमा करावे.

**4.618 दिर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती पैठणचे सन 2014-2015 चे लेखा परीक्षणात विविध योजनांच्या रोखकिर्दीत दिर्घकाळापासुन अनावश्यक अखर्चित निधी पडुन असल्याचे दिसते, विविध योजनाच्या शिल्लक निधीच्या अल्प गुंतवणुकीव्दारे प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम ही जिल्हा परिषद उत्पन्नाची बाब समजुन जिल्हा परिषद उत्पनाच्या शिल्लक रक्कमेच्या गुंतवणूकी वरील

व्याज जमा दर्शवुन व त्या रक्कमांचा विनियोग महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हायादीत अंतर्भुत असलेल्या बाबीवर नमुद करावा. विकास कामे व विकास योजनासाठी निधी खर्च केल्यानंतर राहिलेल्या निधीचा वेळोवेळी आढावा घेवुन अल्प मुदतीच्या ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करावी. परंतु अशी कार्यवाही न करता प्रदीर्घ कालावधी पर्यंत निधी पंचायत समितीस्तरावर पडुन आहे सदर निधीची रक्कम जिल्हा परिषदेस वर्ग केली असती तर जिल्हा परिषदेस 8.6 टक्के प्रमाणे 1,33,46,474/- व्याज मिळाले असते व ते विकास कामासाठी वापरता आले असते. रक्कम पंचायत समिती स्तरावर पडुन राहिल्याने जिल्हा परिषदेचे नुकसान झाल्याचे दिसते.

**4.619 कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांनी व्यावसायिक परीक्षा विलंबाने उत्तीर्ण केलेली असतांना नियमित वेतनवाढ मंजुर करणेबाबत. (राज्य क्षेत्र निधी)**

**पंचायत समिती अंबड, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** श्री. डी. के. दाभाडे, कनिष्ठ अभियंता व इतर शाखा अभियंता यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक परीक्षा 2006/प्र.क्र.977/ आस्था-10, दिनांक 21/04/2006 नुसार कनिष्ठ अभियंता यांना विहीत केलेली व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याने अशी परीक्षा उत्तीर्ण केली नसेल तर त्यांची वेतनवाढ रोखणे आवश्यक राहील, तसेच सदर परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या उमेदवारास कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना वरील वेतन श्रेणी आणि वरिष्ठपदावरच्या पदोन्नतीसाठी विचार करण्यात येवु नये. तसेच शासन परीपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक एपीटी 1088/सी आर 921/13,दिनांक 20/11/1989 मधील तरतुदीनुसार ज्या कर्मचाऱ्यांचे वय 45 वर्ष पुर्ण होईल तेव्हा त्या दिनांकापासुन त्यांना सदर परीक्षेतुन सुट देऊन उक्त लाभ देण्यास हरकत नाही, असे नमुद आहे. त्यानुसार संबंधितांची वेतनवाढ विहीत संधीनंतर रोखणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही व संबंधितांना नियमित वेतनवाढ मंजुर केल्याने वेतनाचे जादा प्रदान झाल आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम 1985 चे नियम 3 नुसार प्रत्येक जिल्हा परीषद कर्मचाऱ्याने अशी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, तसेच नियम 4 नुसार संबंधिताने चार वर्ष तीन संधीत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे व जर विहीत वेळेत परीक्षा उत्तीर्ण केली नाही तर नियम 5 नुसार पुढील वेतनवाढ अनुज्ञेय नाही असे असतांना त्यांनी विलंबाने परीक्षा उत्तीर्ण केली असतांना त्यांना नियमित वेतन वाढ मंजुर केली आहे. जादा वेतन अदाईची परिगणना करून अतिप्रदानाची रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

**4.620 विस्तार अधिकारी (पंचायत) व कनिष्ठ अभियंता यांच्या प्रवास भत्ता देयकातील अनियमितता.**

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती गेवराई येथील कर्मचा-यांनी कार्यालयात उपस्थित असतांना, रजेवर असतांना तसेच निवडणुक कामासाठी प्रतिनियुक्तीवर असतांना त्या कालावधीत पंचायत समितीकडील कार्यालयीन कामकाजाप्रित्यर्थ दौरा दाखवुन नियमबाहयरित्या रुपये 1,91,873/- प्रवास भत्ता घेतलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 32 ते 39 माहे 9/2014 अन्वये श्री पी. एस. तांदळे, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना रुपये 49,420/- ची रक्कम माहे ऑक्टोबर 13 ते मे 2014 कालावधीतील प्रवास भत्त्यापोटी अदाई केलेली आहे. श्री. तांदळे हे ऑक्टोबर 2014 ते फेब्रुवारी 2015 मध्ये दौरे दर्शविलेल्या दिवशी कार्यालयात हजर असल्याचे उपस्थितीपटावरुन दिसुन येते तथापि त्यांनी दौरा केल्याचे दर्शविलेले आहे. तसेच ते दिनांक 18/03/2014 ते 27/03/2014 व 01/04/2014 ते 18/04/2014 कालावधीत मतदानाच्या कामासाठी तहसीलकडे प्रतिनियुक्तीवर असतांनाही त्यांनी या कालावधीतील पंचायत समितीच्या कामकाज केल्याचे दर्शवुन प्रवास भत्ता घेतलेला आहे.

2) श्री. व्ही. बी. सांवत, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना प्रमाणक क्रमांक 40 ते 47 माहे सप्टेंबर 2014 अन्वये रक्कम रुपये 46,585/- ची रक्कम माहे ऑक्टोबर 13 ते मे 2014 कालावधीतील प्रवास भत्त्यापोटी अदाई

केलेली आहे. श्री. सावंत यांनी माहे ऑक्टोबर 13 ते मे 2014 कालावधीत दौरा दर्शविलेल्या दिवशी ते कार्यालयात उपस्थित असलेल्या दिवशी देखील दौरा दर्शवुन प्रवास भत्ता घेतलेला आहे.

3) श्री. व्ही. एस. जाधव, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना प्रमाणक क्रमांक 55 ते 62 माहे सप्टेंबर 2014 अन्वये रुपये 35,538/- ची रक्कम माहे ऑक्टोबर 13 ते मे 2014 कालावधीतील प्रवास भत्त्यापोटी अदाई केलेली आहे. श्री. जाधव यांनी माहे ऑक्टोबर 13 ते मे 2014 कालावधीत दौरा दर्शविलेल्या दिवशी ते कार्यालयात उपस्थित असलेल्या दिवशी देखील दौरा दर्शवुन प्रवास भत्ता घेतलेला आहे. तसेच श्री. जाधव हे दिनांक 18, 19 व 20/11/2013 रोजी नैमित्तीक रजेवर तर दिनांक 19/12/2013 ते 30/12/2013 व 16/01/2014 ते 30/01/2014 या कालावधीत उपस्थिती पटावरुन अर्जित रजेवर असल्याचे दिसुन आले. रजेवर असतांना देखील त्यांनी प्रवास दर्शवुन प्रवास भत्ता घेतला आहे.

4) श्री. एस. एस. चौधरी, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना प्रमाणक क्रमांक 63 ते 65 माहे सप्टेंबर 2014 अन्वये रुपये 11,930/- ची रक्कम माहे मार्च 2013 ते मे 2014 कालावधीतील प्रवास भत्त्यापोटी अदाई केलेली आहे. श्री. चौधरी यांनी माहे मार्च 13 ते मे 2014 कालावधीत दौरा दर्शविलेल्या दिवशी ते कार्यालयात उपस्थित असतानादेखील दौरा दर्शवुन प्रवास भत्ता घेतलेला आहे. देयके मुदतबाहय असतांना त्यास सक्षम अधिका-याची मंजुरी घेतली नाही. श्री. आर. बी. वनवे, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना प्रमाणक क्रं. 49 ते 54 माहे सप्टेंबर 2014 अन्वये रुपये 36,715/- ची रक्कम माहे डिसेंबर 2013 ते मे 2014 कालावधीतील प्रवास भत्त्यापोटी अदाई केलेली आहे. श्री. वनवे यांनी माहे डिसेंबर 13 ते मे 2014 कालावधीची दौरा दैनंदिनी मंजुर नसतांना प्रवास भत्ता संबंधितास अदा केला आहे

5) श्री. व्ही. एम. विदयागर, कनिष्ठ अभियंता यांना प्रमाणक क्रमांक 125/9-2014 अन्वये माहे एप्रिल 2014 महिन्याच्या प्रवास भत्त्यापोटी रुपये 11,685/- अदा केलेले आहेत. श्री. विदयागर हे दिनांक 13/04/2014 ते 18/04/2014 या कालावधीत तलवाडा महसुल मंडळात निवडणुक कामासाठी प्रतिनियुक्त होते तथापि त्यांनी सदर कालावधीत इतरत्र दौरे दर्शवुन रुपये 2,785/- चा प्रवास भत्ता घेतला आहे तो वसुलपात्र आहे.

6) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास-1085/प्र.क्र./1729/57,दिनांक 21/07/1986 नुसार विहित केल्यानुसार संबंधितांनी आगाऊ दौरा कार्यक्रम गटविकास अधिकारी यांचेकडुन मंजुर करुन दौरे करणे आवश्यक असतांना अशी मंजुरी न घेताच दौरे केलेले आहेत तसेच दौरे मोटार सायकलने केलेले असुन स्वत:चे वाहन वापरणेस पुर्वपरवानगी घेतलेली नाही.

**4.621 सौर पथदिवे बसविण्याच्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती परळी यांनी अनु. जाती व नवबौध्द घटकांचा विकास या योजनेंतर्गत सौर पथदिवे बसविणेसाठी रुपये 2,64,615/- एवढा खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौर पथदिवे खरेदी मे. इलेक्ट्रा सोलार सिस्टीम कोरेगांव यांच्याकडून प्रति सौर दिवा रुपये 17,641/- प्रमाणे ग्रामपंचायत तडोळी यांनी 10 सौर पथदिवे तर ग्रामपंचायत जळगव्हाण यांनी 5 पथदिवे खरेदी केलेले आहेत. महाराष्ट्र उर्जा विकास संस्था (MEDA) यांचा दरकरार क्रमांक आरसी-2013-14/ सीआर-9/ सोलार/4867 दिनांक 26/09/2013 अन्वये मे. इलेक्ट्रा सोलार सिस्टीम कोरेगांव हे संस्था दरकरारधारक होती परंतु सदरील दरकरार हा दिनांक 31/03/2014 पर्यन्तच अस्तिवात असतांना सदर ग्रामपंचायतीने माहे फेब्रुवारी 2015 मध्ये सदर दरकरारावर संबंधिताकडुन खरेदी केलेली आहे. सौर पथदिवे खरेदी खर्च रुपये 2,64,615/- अमान्य करण्यात येत आहे. पंचायत समितीने दरकरार उपलब्ध नसल्यास सदर बाबीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे अभिप्रेत असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) प्राप्त साहित्य योग्य दर्जाचे प्राप्त झाल्याबाबत देयकावर प्रमाणीत केलेले नाही.

**4.622 मुद्रांक शुल्क अनुदान वाटपातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात मुद्रांक शुल्क अनुदान वाटपावर याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील देयक नमुना नंबर 29 आकस्मिक खर्चाचे देयकावर सदरील अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. सदरील देयकावर प्रमुख लेखाशिर्ष व उपलेखा शिर्ष नमुद करणेत आली नाहीत. त्यामुळे सदरील देयक कोणत्या लेखाशिर्षकातून खर्च करण्यात आला याची नोंद प्रमाणकावर घेण्यात आलेली नाही. सदरचे अनुदान 13 वा वित्त आयोगातुन वितरीत केल्याचे दिसते. सदर बाब गंभीर आहे.

2) सदरील देयकासोबत गटविकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक निरंक दिनांक निरंक अनुसार गटविकास अधिकारी यांनी मुद्रांक शुल्क अनुदान सन 2012-2013 करिता रक्कम रुपये 10, 91,130/- या खर्चास मंजुरी दिल्याचे दिसुन आले. सदरील अनुदान दिनांक 31/03/2015 रोजी संबंधित एकुण 52 ग्रामपंचायतींना रुपये 10,91,130/- धनादेशाद्वारे वाटप करण्यात आल्याचे दिसुन आले. सन 2012-2013 चे अनुदान दिनांक 31/03/2015 रोजी विलंबाने तसेच प्राप्त तरतुदी मधुनच न वाटप करता 13 व्या वित्त आयोगाच्या निधीतुन वाटप करण्यात आले.

3) संबंधित ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर 7 ची पावती प्राप्त केली नाही.

4) 13 व्या वित्त आयोग शासनाच्या मार्गदर्शक सुचना ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग निर्णय तेविआ/2010/प्र.क्र.22/वित्त-4,दिनांक 30/08/2010 मध्ये 13 व्या वित्त आयोगाचे अनुदान खर्च करणे बाबत मार्गदर्शन सुचना आहेत. त्यानुसार कार्यवाही झालेली नाही, त्यामुळे सदर खर्च लेखापरिक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

**4.623 अभिकरणातील प्रमाणके तपासणीतील त्रूटयाबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 87) -** प्रमाणके तपासणीत खालीलप्रमाणे उणीवा आढळुन आल्या आहेत.

धनादेशाची रोकडवही उणीवा.

1) धनादेश क्रमांक 009148 रूपये 17,789/- असून रूपये 17,739/- नोंदविले आहे.

2) धनादेश क्रमांक 009155 रूपये 17,31,727/- ही रक्कम पारीत झाली असून याची नोंद किर्दमध्ये घेण्यात आली नाही.

3) धनादेश क्रमांक 009133 रूपये 19,78,751/- असून याची नोंद रोखवहीत दर्शविली नाही.

4) धनादेश क्रमांक 009808 या धनादेशाची नोंद रोखपुस्तिकेत घेतली नाही.

**4.624 वित्त प्रेषण बँकेत उशिराने जमा झालेबाबत.**

**पंचायत समिती उमरी, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती उमरीचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात वित्तप्रेषणाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद नांदेड कडून पंचायत समिती ला विविध योजनांचे माहे मार्च-2015 चे वित्त प्रेषण प्राप्त झालेले आहे. पंचायत समितीने वित्त प्रेषणाच्या नोंदी रोकडवहीत जमा बाजूस मार्च-2015 मध्ये घेऊन त्या संबंधीचा खर्च मार्च-2015 मध्ये नोंदविला आहे तथापि वित्तप्रेषण मात्र बँकेंत मार्च-2015 मध्ये जमा न होता विलंबाने जमा झालेले आहे.

2) रक्कम रूपये 1,62,07,702/- बँकेंत उशीराने जमा झाले आहे.

**4.625 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतून पडलेल्या रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती भूम, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 29) -** पंचायत समिती, भूम चे एकुण रुपये 4,26,10,365/- इतकी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतून पडली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीचे एकुण रुपये 4,26,10,365/- इतकी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतून पडली आहे. पंचायत समितीचा सदर बँकेशी आर्थिक व्यवहार बंद आहे, त्यामुळे गुंतून पडलेली रक्कम उपयोगी पडत नसल्याचे निदर्शनास येते त्यामुळे पंचायत समितीचे पर्यायाने शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) गुंतून पडलेली रक्कम रुपये 4,26,10,365/- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडुन प्राप्त करुन पंचायत समितीचे ज्या बँकेत आर्थिक व्यवहार चालु आहे त्या बँक खाती वळती करुन घेणे आवश्यक आहे.

**4.626 दीर्घकाळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती लातूर व चाकूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4 व 16) -** पंचायत समिती लातूर व चाकूर येथे सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणामध्ये पंचायत समितीकडील विविध योजनाच्या रोज किर्दची पडताळणी केली असता दिर्घकाळापासून पंचायत समिती स्तरावर विविध बँकेच्या खात्यामध्ये शासकीय योजनेचा निधी अनावश्यकरित्या पडून असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती लातूर यांचे सन 2014-2015 मध्ये पंचायत समितीकडे एका वित्तीय वर्षात म्हणजे 12 महिन्याच्या कालावधीसाठी सरासरी रक्कम रुपये 10,47,56,688/- पडून असल्याचे दिसून येते. पंचायत समिती चाकूर येथे प्रती महिना सरासरी रक्कम रुपये 3,41,71,037/- पंचायत समिती स्तरावर शिल्लक ठेवण्यात आली आहे.

2) उक्त निधी जिल्हा परिषदेकडे वेळीच वर्ग केला असता तर जिल्हा परिषदेस (भविष्य निर्वाह निधीच्या) रकमेवर अनुज्ञेय असलेले व्याज दर 8.5 टक्के प्रमाणे रुपये 89,04,318/- पंचायत समिती लातूरला व्याज मिळाले असते व पंचायत समिती चाकूरला रक्कम रूपये 29,72,880/- व्याज मिळाले असते. सदर व्याजाची रक्कम जिल्हा परिषदेस विकास कामासाठी वापरता आली असती तथापि पंचायत समिती लातूर यांनी अशी रक्कम प्रदिर्घ कालावधीपासून विविध योजनांची गट स्तरावर अनावश्यक रित्या शिल्लक ठेवून घेतल्यामुळे जिल्हा परिषदेचे एकूण रक्कम रुपये 1,18,77,198/- वित्तीय नुकसान झालेले आहे.

**4.627 विविध लेखाशीर्षाखाली झालेल्या जादा प्रदान वसुलीच्या रक्कमा शासन खाती भरणा न केलेबाबत.**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमाकं 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 40 (1) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही त्याच वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित तपशीलवार लेखाशीर्षाखाली चालू वर्षाच्या खर्चामधून वजा करून समायोजित करावी. परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही पंचायत समितीने केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 40 (2) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही नंतरच्या वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित प्रधान जमा लेखाशीर्षाखाली करण्यात येतील. पंचायत समितीने सन 2013-14 व सन 2014-15 या वित्तीय वर्षात अनुक्रमे रक्कम रुपये 15,93,964/- व रक्कम रुपये 14,67,377/- अतिप्रदानाची वसुली केलेली आहे. सदर अतिप्रदानाची वसुली रक्कम रुपये 30,61,341/- शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना त्या पंचायत समिती स्तरावर पडून आहेत.

3) मागील सर्व वर्षाचा सर्व रोखवहीचा या मुद्द्याच्या अनुषगाने आढावा पंचायत समितीने घ्यावा व सदरील अतिप्रदानाच्या रक्कमा काढून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.628 विविध लेखाशीर्षाखाली झालेल्या जादा प्रदान वसुलीच्या रक्कमा शासन खाती भरणा न केलेबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती निलंगा सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात हस्तांतरीत योजनेच्या वार्षिक लेख्याची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, पंचायत समिती स्तरावर हस्तांतरित योजनेच्या विविध लेखाशीर्षाखाली अतिप्रदान झालेले असून सदरील जादा प्रदानाच्या रक्कमा पंचायत समितीने वसूल केलेल्या आहेत. परंतु सदरील रक्कमा शासन खाती भरणा न करता पंचायत समिती स्तरावर पडून आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 40 (1) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही त्याच वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित तपशीलवार लेखाशिर्षाखाली चालू वर्षाच्या खर्चामधून वजा करून समायोजित करावी. परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही पंचायत समितीने केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 40 (2) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही नंतरच्या वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित प्रधान जमा लेखाशीर्षाखाली करण्यात येतील. पंचायत समितीने, सन 2014-15 या वित्तीय वर्षात रक्कम रुपये 3,51,108/- अतिप्रदानाची वसुली केलेली आहे. सदर अतिप्रदानाची वसुली रक्कमा शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना त्या पंचायत समिती स्तरावर पडून आहेत.

3) मागील सर्व वर्षाच्या सर्व रोखवहीच्या या मुद्द्याच्या अनुषंगाने आढावा पंचायत समितीने घ्यावा व सदरील अतिप्रदानाच्या रक्कमा काढून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.629 मुलभूत सुविधा अंतर्गत काम अपूर्ण असल्याने झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामे लेखापरीक्षण वर्षाखेर अपूर्ण आहेत. कामे विहीत वेळेत पुर्ण न केल्यामुळे शासनाकडुन प्राप्त निधी सदर कामांवर नाहक गुंतून रहातो व ग्रामीण भागातील जनतेस योजनेचा लाभ मिळत नाही. त्याच प्रमाणे कामावर खर्च वाढण्याची शक्यता असते व त्यामुळे शासन निधीवर त्याचा भार पडतो पर्यायाने शासन निधीचे नुकसान होते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 (2) (ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल. व त्यानंतर अखर्चीत साहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त कामांचा रक्कम रुपये 30,00,000/- अखर्चित राहिलेला आहे. तथापि पंचायत समितीने सदरील अखर्चित निधी शासन खाती भरणा केलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे परिच्छेद 2 जिल्हा परिषदांकडील हस्तांतरीत योजना (बांधकाम विभाग) योजनाबाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहीत करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावे. तथापि सन 2012-13 मधील प्राप्त अनुदाने कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने व कामे अपुर्ण असल्याने शासनाच्या योजनांचा जनतेस फायदा होऊ शकला नाही. तसेच कामे अपुर्ण राहिल्याने शासन निधी नाहक गुंतून पडला असुन निधीचा गैरव्यवहार, अपहार, इत्यादी होण्याची व कामाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) अर्धसमास पत्र क्रमांक 13, दिनांक 28/10/2015 अन्वये अभिप्राय मागवूनही कोणतेही अभिप्राय देण्यात आले नाहीत.

**4.630 खाते क्रमांक 2 मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ सन 2014-2015 खाते क्रमांक 02 स्वप्रपंजी नावाने खाते ठेवले असुन खात्यात रक्कमा जमा घेतल्या आहेत. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए 1090/सीआर-1652/24, दिनांक 07 जानेवारी 1992 अन्वये असे लेखे बंद करण्या बाबत आदेशीत करूनही त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 57 प्रमाणे पंचायत समिती प्राप्त सर्व अनुदाने / रक्कमा नमुना नंबर 7 मध्ये जमा घेणे आवश्यक असताना (हस्तांतरण योजना, अभिकरण योजना, जिल्हा परिषद स्वनिधी, पंचायत समिती स्वनिधी) अशी कार्यवाही न करता पंचायत समिती ने स्वतंत्र रोख पुस्तिका ठेवुन व्यवहार केलेले आहेत. जे नियमबाहय आहे.

3) संबंधीत रक्कमा त्या त्या लेखाशिर्षातंर्गत रकाना क्रमांक 05 मध्ये दर्शविल्याप्रमाणे अभिकरण, हस्तारण, जिल्हा परिषद उपकर, पंचायत समिती उपकर व इतर खात्यात लेखाशिर्षनिहाय जमा घेणे आवश्यक असताना खाते क्रमांक 02 मध्ये स्वयप्रपंजी लेख्यात जमा घेतलेल्या आहेत. तसेच खाते क्रमांक 02 स्वप्रपंजी लेखे मधुन खर्च केलेला आहे जे नियमबाहय आहे.

4) तसेच बँकेशी ताळमेळ घेतलेला नाही तरी ताळमेळ घेवुन पुर्तता दर्शवावी.